# दिंडोरी नगरपंचायत, दिंडोरी

## जाहीर सूचना

**कंत्राटी पदासाठी (शहर समन्वयक City Co-Ordinator) नेमणे कामी अर्ज मागविणे बाबत.**

स्वच्छ महाराष्ट्र अभियान अंतर्गत नागरी २.० अंमलबजावणी करणे व त्या अंतर्गत अनुषांगिक विविध कामे करण्यासाठी दिंडोरी नगरपंचायत, दिंडोरीकरिता ११ महिन्यांसाठी शहर समन्वयक ( City Co-ordinator ) या कंत्राटी पदासाठी अर्ज मागविण्यात आहेत.

| पदनाम | पदांची संख्या | शैक्षणिक अर्हता | वयोमर्यादा | अनुभव | मानधन |
|---|---|---|---|---|---|
| शहर समन्वयक ( City Co-Ordinator ) कंत्राटी | ०१ (एक) | मान्यताप्राप्त<br>१ ) बी.ई./बी.टेक (कोणतीही शाखा)<br>२ ) बी.आर्क<br>३ ) बी. प्लॅनिंग<br>४ ) बी.एससी. कोणतीही शाखा | कमाल वयोमर्यादा ३५ वर्ष ( शहर समन्वयक म्हणून अनुभव धारण करणाऱ्या उमेदवारास अनुभव वयोमर्यादा शिथिल करता येईल ) | स्थानिक स्वराज्य संस्था (नागरी) स्थानिक कार्यालयाशी निगडित कामाचा सहा महिन्यांचा किमान अनुभव आवश्यक आहे. | ४५०००/- (प्रतिमाह) |

( १ ) वरील नमूद शैक्षणिक पात्रता व अनुभवाचे निकड पूर्ण केलेल्या उमेदवारांसाठी विहीत नमुन्यातील अर्ज नप कार्यालयात रक्कम रु. २०/- भरून घेता येईल. सदर अर्ज परिपूर्ण भरून सर्व शैक्षणिक व अनुभव प्रमाणपत्रासह कार्यालयीन वेळेत पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग, दिंडोरी नगरपंचायत, जिल्हा नाशिक येथे दि. २३/११/२०२२ दु. ०३.०० वा पर्यंत दाखल करणे बंधनकारक राहील. ( २ ) प्राप्त अर्जांची पडताळणी २३/११/२०२२ वा. दु. ०४.०० वा. करण्यात येईल. ( ३ ) छाननीअंती प्राप्त उमेदवारांची मुलाखत दि. २५/११/२०२२ रोजी ११.०० वाजता मा. जिल्हा सहआयुक्त सो. नगरपरिषद प्रशासन सो, मा. जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे समक्ष घेण्यात येईल. (पात्र उमेदवारांना मुलाखतीसाठीचे पत्र नप कार्यालयामार्फत देण्यात येईल. ) ( ४ ) नप कार्यालयात तसेच मा. जिल्हा सहआयुक्त सो., नगरपरिषद प्रशासन, मा. जिल्हाधिकारी कार्यालयात वरील सर्व कागदपत्रकाच्या मूळ ( Original ) परिपूर्ण प्रतिसह हजर राहणे बंधनकारक राहील. ( ५ ) सदर नियुक्ती निव्वळ कंत्राटी स्वरूपात असेल. नोकरीवर कोणताही हक्क सांगता येणार नाही. ( ६ ) इतर अटी-शर्ती नप कार्यालयात वाचून, पाहून उमेदवाराने स्वतः स्वाक्षरीत करणे बंधनकारक राहील. ( ७ ) प्राप्त होणारे अर्ज एक अथवा सर्व अर्ज नाकारण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत. ( ८ ) अर्जदाराच्या कोणत्याही अटी शर्ती मान्य करण्यात येणार नाहीत.

स्वा/-
**मुख्याधिकारी**
**दिंडोरी नगरपंचायत, दिंडोरी**

जा.क्र.- दिनपं/पापु.स्ववि/सी.सी/१७६६/२०२२ दि. २१/११/२०२२